# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 10/07/2021 (शनिवार)

(सकाळ)

---

### घरफोडी

1) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावरील नविन अडयाळवाले लेआउट उमरेड येथे दि. 02/07/2021 चे 08.30 वा. ते दि. 08/07/2021 चे 11.00 वा. चे सुमारास फिर्यादी नामे– आनंद गंगारामजी तुळे वय 64 वर्ष रा. नविन अडयाळवाले ले आडट उमरेड दि 02/07/2021 ला बेसखेउा जि अमरावती येथे आपले परीवारासह गेलो व तेथे मुक्कामी असता त्यांचे घरासमोर राहणरे वसंत भोयर यांचा फिर्यादीला फोन आला की तुमचे घराचे दरवाजाचे कुलुप तुटलेली दिसत आहे असे सांगीतल्याने फिर्यादी हे दि 9/7/21 रोजी 11/45 वा स्वःतचे घरी परत आले व  घराची पाहणी केली घरातील सामान अस्थव्यस्त पडलेले होते तेव्हा मी लाकडी टेबलचे ड्रावरमध्ये ठेवलेले नगदी 6,500 रू दिसुन आले नाही तसेच माझी पत्नी सौ मंगला हिने सांगीतले की लाकडी कपाटाचे ड्रावर मध्ये ठेवले नगदी 14,000 रू सुदधा दिसुन आले नाही असा एकुण 20,500 चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथ आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार आनंद धात्रक मो.क्र. 95453 55470 हे करीत आहे.

2) पो.स्टे. अरोली :– अंतर्गत 9 कि. मी. अंतरावरील नविन हिंगणा येथे दि. 08/07/2021 चे 22.00 वा. चे 22.30 वा. चे सुमारास फिर्यादी नामे– सौ. माया ज्योतीश गजभिये वय 45 वर्षे रा हिंगणा ता मौदा, जि. नागपुर पती हे  पिंपरी ता कूही येथे शेतीच्या कामाने राहतात व आठवडयातुन एक दोनदा हिंगणा येथे येत असतात फिर्यादीचे पती पिंपरी ता कुही येथे असल्यावर फिर्यादी  हिंगणा येथे  एकटीच असते  फिर्यादीचे  घरासमोर सिमेंट रोड असुन त्या पलीकडे प्रविण उर्फ डोमा रधुनाथ ढगे हा त्याचे  परीवारासह  राहतो घ. वेळी दरम्यान, फिर्यादी आपले  घरी  एकटीच मधल्या  रुममध्ये झोपलेली असताना फिर्यादीला किचन रुम मधुन खिडकीचा आवाज आल्याने  फिर्यादी झोपेतुन उठले व किचन रुमकडे गेली असता फिर्यादीचे घरासमोर राहणारा प्रविण ढगे हा त्याचे हाताने खिडकीचे सलाख वाकविताना दिसल्याने फिर्यादी मुख्य दरवाजाकडे आली व दरवाजा उघडुन अंगणात गेल्यानंतर चोरचोर म्हणुन जोरजोराने ओरडली फिर्यादीचे  आवाजाने धरासमोरील सदानंद पाटील व दोन  तीन मुले  फिर्यादीचे  जवळ आले तेव्हा फिर्यादीने त्याना सांगीतले की, प्रविण ढगे हा त्याचे हाताने खिडकीचे सलाख वाकवित आहे असे सांगितल्यानंतर सदानंद पाटील व दोधे तिघे खिडकिच्या दिशेने गेले असता त्याना कोणीही दिसले नाही म्हणुन ते आपाआपले धरी निधुन गेले .त्यानंतर फिर्यादी ने घराला लॉक लावुन फिर्यादीने पतीला फोन करुन घटनेची माहिती दिली व  त्यानंतर फिर्यादी धराजवळ राहणारे  यादव बाबुराव बागडे यांचे कडे आराम करण्याकरिता निधुन गेली. आरोपीने फिर्यादीच्या घराचे किचन रुमचे सलाखी, चोरी करण्याचे उद्देशाने  वाकवताना फिर्यादीला  दिसली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथ आरोपीविरुध्द कलम 457, 380, 511 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोशि उमेश इंगळे मो नं 9923463461 हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. कळमेश्वर :– दिनांक 08/07/2021 चे 06.30 वा. चे सुमारास पो.स्टे. कळमेश्वर हद्दीत फिर्यादीयांची 15 वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि अश्विनी बावचे 8551969100 या करीत आहे.

## अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 05 कि. मी. अंतरावरील एन एच 47 महामार्ग किल्ले कोलार पुलीया दहेगाव शिवार येथे दिनांक 09/07/2021 चे 04:00 वा. ते 04.10 वा. दरम्यान अज्ञात इसम हा किल्ले कोलार नदीच्या पुलावर हॉयचे रोड क्रास करीत असतांना अज्ञात वाहत चालकाने आपल्या ताब्यातील वाहन सावनेर कडुन नागपुर कडे जात असतांना भरधाव वेगाने व निष्काळजीपणे वाहन चालवुन अज्ञात इसमास जोरात धडक दिली. या अपघातात अज्ञात वाहनाच्या चाकात तो येवुन त्याचे डोक्यास, हातपायास गंभीर दुखापत होवुन जागीच मरण पावला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोउपनि किरण शेवाळे, पो.स्टे. खापरखेडा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 134(अ)(ब)/184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि किरण शेवाळे 9421320411 हे करीत आहे.

2) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 08 कि. मी. अंतरावरील जुनेवाणी गावाजवळ येथे दिनांक 21/06/2021 चे 19:00 वा. ते 19.25 वा. दरम्यान एमएच– 40/ बीअ– 0278 क्रमांकाच्या मोटरसायकलचा चालक आरोपी/मृतक नामे– नितेश ज्ञानेश्वर मरसकोल्हे, वय 27 वर्ष, रा. कोंढासावळी हा कोंढासावळी वरून खडकी गावाला जात असतांना त्याने त्याचे ताब्यातील मोटरसायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविल्याने त्याची मोटरसायकल स्लिप होवून अपघात झाला. त्यास उपचाराकरीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे नेले असता उपचार दरम्यान दि 23/06/2021 रोजी स्वतः चे मरण पावण्यास आरोपी कारणीभुत असल्याचे निष्पन्न झाले.

सदर प्रकरणी सर तर्फ मपोहवा पंचफुला मोरे, पो. स्टे. काटोल यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री लभाने 9823433863 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर